# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय सोलापूर

(गृह शाखा)

दुरध्वनी क्र. ०२१७- २७३१०२१, Email-id-dcbsolapur@gmail.com

क्र. २०२१/डिसीबी २/ प्र.क्र. /आरआर-५०८९ दिनांक २७/०९/२०२१.

**(फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये)**

**आदेश**

ज्याअर्थी, दिनांक १३/६/२०२१ रोजी स्फोटके भरलेले दोन ड्रोन जम्मु विमानतळावरील भारतीय स्टेशनवर आदळून याठिकाणच्या इमारतीस छोट्या प्रमाणात क्षती पोहोचली. सदर घटनेच्या पार्श्वभुमीवर ड्रोनद्वारे होणारे संभावित हल्ले रोखण्यासाठी धोरण ठरविण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी, वरील घटनेच्या पार्श्वभुमीस अनुसरुन महाराष्ट्र राज्यातील व महत्वाच्या ठिकाणी ड्रोनद्वारे शुटींग करण्यास प्रतिबंध करण्यासाठी निषेधात्मक आदेश जारी करण्याबाबत महाराष्ट्र शासन गृह विभाग यांचेकडील क्रमांक एसएसए-०७२१/ प्र.क्र.१५४/ विशा ४ दिनांक २०/०७/२०२१ व मा.पोलीस महासंचालक मुंबई यांचेकडील दि. १२/०८/२०२१ च्या पत्रान्वये निर्देश देण्यात आलेल्या आहेत.

ज्याअर्थी, वरील निर्देशास अनुसरुन मा. पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी त्यांचेकडील पत्र क्र. जिविशा/संकीर्ण/२०२१-३५६, दि.१२.०९.२०२१ अन्वये भविष्यात एखाद्या हल्यास प्रतिबंध होऊन सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील सार्वजनिक कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आबाधित राहण्याच्या दृष्टीने सहाय्य होणेकामी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ नुसार विनापरवाना व बेकायदेशीररित्या ड्रोन प्रक्षेपण व ड्रोनचा वापर करण्यास प्रतिबंध करण्याचे आदेश लागु करणे आवश्यक असल्याचे माझे निदर्शनास आणून दिले आहे.

त्याअर्थी, मी शमा पवार, अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९७३ चे कलम १४४ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन असा आदेश देते की, सोलापूर जिल्ह्यात सार्वजनिक कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आबाधित राहण्याच्या दृष्टीने सहाय्य होणेकामी दिनांक- २८.०९.२०२१ रोजीचे सकाळी ०८.०० वाजले पासून ते दिनांक- २६.११.२०२१ रोजीच्या रात्री २०.०० पर्यंत सोलापूर जिल्ह्यात (पोलिस आयुक्तालयाची हद्द वगळून) विनापरवाना व बेकायदेशीररित्या ड्रोन प्रक्षेपण व ड्रोनचा वापर करण्यास मनाई करीत आहे.

सदरचा आदेश माझ्या सही व शिक्क्यानिशी दिला असे.

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE अपर जिल्हा दंडाधिकारी सोलापूर SOLAPUR

(शमा पवार)
अपर जिल्हादंडाधिकारी सोलापूर

स्थळ :- सोलापूर
दिनांक :- २७/०९/२०२१

प्रत:- पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण यांचेकडे प्रसिध्दीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
प्रत:- उपविभागीय दंडाधिकारी पंढरपूर / माढा / माळशिरस/ मंगळवेढा विभाग अकलूज यांना माहितीसाठी.
प्रत:- व्यवस्थापक,येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, पुणे. यांचेकडे राजपत्रात प्रसिध्द करणेसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रत:- जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर यांना सर्व स्थानिक प्रमुख वृत्तपत्रात प्रसिध्द करणे कामी.
प्रत:- तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, माढा/ करमाळा/ पंढरपूर/ सांगोला/ मंगळवेढा/ माळशिरस यांचेकडे माहितीसाठी अग्रेषित.
प्रत:- मुख्याधिकारी नगरपालिका, कुर्डूवाडी/सांगोला/करमाळा/माळशिरस
प्रत :- राष्ट्रीय सूचना-विज्ञान केंद्र (NIC), जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
२/- सदरचा आदेश दि. २६.११.२०२१ पर्यंत वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिद्ध करावे.



Scanned with CamScanner